# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4
Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )

## National Service Scheme

Dr.I.S. Mohurley
Programme Coordinator
Mobile: 7774027661, 9422893555

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
Email : director.studentwelfaregug@ gmail.com


पत्र क्र. गो.वि/रासेयो/76/2015 दि. 07/08/2015

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय :– रासेयो नविन एकक सुरु करण्यासाठी प्रस्ताव सादर करणेबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयांन्वये आपणास कळविण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठाचे सन २०१५–१६ हे चौथे शैक्षणिक सत्र असून विद्यापीठामध्ये प्रथम शैक्षणिक सत्रापासूनच राष्ट्रीय सेवा योजना रा तु म नागपूर विद्यापीठातून गोंडवाना विद्यापीठास संख्या आवंटनासह जशीच्या तशी हस्तांतरीत करण्यात आली. रासेयोमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यानंतर दोन वर्षात त्याचा सर्वांगिण विकास होवून विद्यार्थी सर्वगुणसंपन्न होण्यास मदत होते. सदर विद्यार्थी भविष्यकाळात यशस्वी नागरिक म्हणून गौरविले जातात.

दरम्यानच्या काळात ज्या महाविद्यालयांनी रासेयो अहवाल आणि अनुदान प्रलेखे व अंकेक्षण विवरणे विद्यापीठाच्या रासेयो कक्षाकडे पाठविण्यास अनियमितता दाखविली अशा महाविद्यालयांची रासेयो स्वयंसेवक संख्या कपात केल्यानंतर ती स्वयंसेवक संख्या अन्य ईच्छुक महाविद्यालयांना आवंटीत करण्यात येणार आहे.

करिता आपल्या महाविद्यालयात सत्र २०१५–१६ या शैक्षणिक वर्षाकरिता रासेयोचे एकक स्थापन करावयाचे असल्यास दि. १० ऑगष्ट २०१५ पर्यंत आपल्या महाविद्यालयामार्फत रासेयो एककाकरिता रासेयो कार्यालय गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे प्रस्ताव खालील कागदपत्रासह सादर करावा म्हणजे पुढील कार्यवाही करणे सोयीचे होईल. त्यानंतर प्राप्त प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.

१. महाविद्यालयाच्या लेटरहेडवर रासेयो एकक मागणी पत्र.
२. रु. १०० च्या स्टॅप पेपरवर हमीपत्र (सोबत नमूना जोडला आहे).
३. रासेयो एकक मागणी प्रस्ताव (सोबत नमूना जोडला आहे).
४. महाविद्यालय शासन व विद्यापीठ मान्यता पत्र (छायांकीत प्रत).
५. मा. प्राचार्य यांचे नेमणुक पत्र (छायांकीत प्रत).
६. रासेयो कार्यक्रम अधिकारी नियुक्ती पत्र.

**तसेच ज्या महाविद्यालयांमध्ये रासेयो एकक कार्यरत आहेत अशा महाविद्यालयांनी सुद्धा वरील क्र. २ व क्र. ६ मध्ये नमूद केलेली कागदपत्रे दि. १४ ऑगष्ट २०१५ पर्यंत पाठविणे आवश्यक आहे.**

कळावे
धन्यवाद!

डॉ. ईश्वर मोहुर्ले
समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना

कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रत माहीतीस्तव:

१. मा. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**वि. सुचना:– (कार्यक्रम अधिकारी नेमणुक करताना सदर प्राध्यापकास विद्यापीठ मान्यता असणे आवश्यक आहे.)**

GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI
(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4
Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )
**National Service Scheme**

**Dr.I.S. Mohurley**
**Programme Coordinator**
Mobile: 7774027661, 9422893555

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
Email : director.studentwelfaregug@ gmail.com

पत्र क्र. गों.वि./रासेयो/74/2015 दि. 07/08/2015

<u>तात्काळ</u>

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित रासेयो महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय :– प्राचार्य व रासेयो कार्यक्रम अधिकारी माहीती प्रपत्र तसेच हमीपत्र त्वरीत भरुन पाठविणेबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयांन्वये आपणास कळविण्यात येते की, मा. कुलगुरु व अध्यक्ष रासेयो गोंडवाना विद्यापीठाचे सन २०१५–१६ हे चौथे शैक्षणिक सत्र असून विद्यापीठामध्ये प्रथम शैक्षणिक सत्रापासूनच राष्ट्रीय सेवा योजना रा तु म नागपूर विद्यापीठातून गोंडवाना विद्यापीठास संख्या आवंटनासह जशीच्या तशी हस्तांतरीत करण्यात आली. दरम्यानच्या काळात महाविद्यालयांनी नविन रासेयो कार्यक्रम अधिकारी नियुक्त केले आहेत परंतु त्यांची माहीती विद्यापीठाच्या रासेयो कक्षाकडे न पाठविल्यामूळे कार्यक्रम अधिकाऱ्यांचा डाटाबेस अपग्रेड करता आला नाही. त्यामूळे कार्यालयीन कामकाजात प्रशासकीय अडचणी निर्माण होत आहेत.

तसेच आयोजीत रासेयो कार्यक्रम/उपक्रमांचा मासिक अहवाल, वार्षिक अहवाल, अनुदान प्रलेखे व अंकेक्षण विवरणे विहीत कालावधीमध्ये प्राप्त होत नसल्यामुळे शासनाकडे वेळेत संबंधीत माहीती सादर करण्यास विलंब होतो. त्यामुळे अनुदान प्राप्त होण्यास उशीर होतो. ही बाब लक्षात घेवुन विद्यापीठस्तरीय रासेयो सल्लागार समिती सभेमध्ये प्रत्येक रासेयो महाविद्यालयांकडुन रु. १००/– च्या स्टॅप पेपरवर हमीपत्र भरुन घेण्याचे ठरविले आहे.

करिता सर्व रासेयो महाविद्यालयांच्या प्राचार्यांना विनंती करण्यात येत आहे की रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्याला आपण दिलेल्या **नियुक्तीपत्राची एक प्रत**, सोबत संलग्न केलेल्या प्रपत्रात **प्राचार्य व कार्यक्रम अधिकारी यांची माहीती** तसेच **रु. १००/– च्या स्टॅप पेपरवर हमीपत्र** भरुन दि. १४ ऑगष्ट २०१५ पर्यंत ishwarmohurley@gmail.com या ईमेलवर किंवा विशेष दुतामार्फत रासेयो समन्वयक गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे कार्यालयास पाठवावे.

कळावे
धन्यवाद!

डॉ. ईश्वर मोहुर्ले
समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना
कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

सहपत्र: वरीलप्रमाणे.

प्रत माहीतीस्तव:

१. मा. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**वि. सुचना:– (कार्यक्रम अधिकारी नेमणुक करताना सदर प्राध्यापकास विद्यापीठ मान्यता असणे आवश्यक आहे.)**